# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/** 764 **/2022-23** दि.05/07 /2022

प्रति,

सिस्टीम मॅनेजर,

संगणक विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मनपा/आस्था/764/2022-23, दि.05/07/2022 रोजीची जाहिर सुचना.

मिरा भाईदर महानगरपालिकेतील आस्थापना विभागात सरळसेवेने/नामनिर्देशनाने पदभरतीसाठी बिंदूनामावली तयार करण्याकरीता अनुभवी सेवानिवृत्त कक्ष अधिकारी सेवा करारपध्दतीने भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात आलेले आहे.

सदरची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

04-07-2022

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत- जाहिर सुचनेची प्रत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 764 /2022-23 दि. 05/07/2022

**सेवानिवृत्त, कक्ष अधिकारी सेवाकरार पध्दतीने उपलब्ध करुन घेणेबाबत.**

**।।जाहीर सूचना।।**

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना विभागात सरळसेवेने/नामनिर्देशनाने पदभरतीसाठी बिंदूनामावली तयार करण्याकरीता अनुभवी सेवानिवृत्त कक्ष अधिकारी सेवाकरार पध्दतीने भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेद्वारांकडून अर्ज मागवित आहेत. इच्छुक उमेद्वार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन वर्ग-01 व वर्ग-02 या संवर्गातून सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे.

इच्छुक व पात्र उमेद्वारांनी दि.21/07/2022 रोजी सायं.4:00 वाजेपर्यंत आवक-जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे टपालाव्दारे व स्वहस्ते अर्ज करावयाचे आहेत. पोस्टाच्या विलंबामुळे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही. अथवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जांचे लखोटे उघडण्यात येणार नसून अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर "कक्ष अधिकारी(सेवानिवृत्त)" पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

**उपलब्ध पद संख्या**:- 01

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | कक्ष अधिकारी (सेवानिवृत्त) | 01 | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) सेवानिवृत्त अधिकारी शासकीय/निमशासकीय वर्ग-01 व वर्ग-02 या संवर्गातील व बिंदुनामावली (रोस्टर) तयार करणेबाबतचा अनुभव असणे आवश्यक. |

**अटी व शर्ती** :-

1) उमेदवार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेला असावा.
2) सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13, दि.17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
3) दि.17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक वेतन व भत्ते लागू राहतील.

4) करारपध्दतीने नेमणूकीकरीता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 64 वर्षापेक्षा अधिक नसावे.

5) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

6) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.

7) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुदध विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

8) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

9) उमेदवाराने अर्ज भरताना राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावे.

10) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

11) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

12)**<u>निवड प्रक्रिया</u>** :-

"कक्ष अधिकारी (सेवानिवृत्त)" या पदासाठी उमेदवारांची मुलाखत घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल.

- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका